विभाग प्रमुख पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
डॉ.पंजाबराव देषमुख कृषि विद्यापीठ, अकोला

ई-मेल:- hdahdspdkv@gmail.com  फोन:- ०७२४-२२५८००१

जा.क्र.वि.प्र/पसंदुशा/ठेका/दरपत्रक/ 1013 /२०२२  दिनांक :- १७.१०.२०२२

## दरपत्रक सुचना

विषय:- पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला **येथील दुग्धशाळेतील जनावरांचे दुध काढणे, देखरेख व स्वच्छता इ. कामे** ठेका पद्धतीने करणेकरिता दर पुरविणेबाबत...

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला **येथील दुग्धशाळेतील जनावरांचे दुध काढणे, देखरेख व स्वच्छता इ. कामे** ठेका पद्धतीने करणेकरिता करणेकरिता खालील शर्ती व अटिंच्या अधीन राहून दर मागविण्यात येत असून सविस्तर दर भरणेकरीता दर पत्रक सोबत जोडले आहे.

1. दुग्धशाळेमधील कंत्राटी/ठेका पद्धतीने कामाचे दर हे प्रति दिवस प्रमाणे सोबत जोडलेल्या दरपत्रकामध्ये भरून दरपत्रक सादर करावे
2. दुग्धशाळेतील ठेका पद्धतीने कामाचे दर पुरविनेबाबत चे दरपत्रक विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., यांचे नावे सादर करावे व लिफाफ्यावर '**दुग्धशाळेतील जनावरांचे दुध काढणे, देखरेख व स्वच्छता इ. कामे**' असा स्पष्ट उल्लेख करावा.
3. विहित नमुन्यातील दरपत्रक कार्यालयीन वेळत स. १०.३० ते सा. ५.३० वाजेपर्यंत बंद पाकीटातच स्वीकारण्यात येतील. दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख **दि. २७.१०.२०२२** असून त्याच दिवशी सा. ५.३० वा. मा. विभाग प्रमुख यांच्या कार्यालयात मंजूर समिती समक्ष उघडण्यात येतील
4. नमूद केलेले कंत्राटी कामाचे दर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून पुढील सहा महिण्याकरिता ग्राह्य राहतील.
5. कंत्राटी कामाकरिता वापरण्यात येणा-या मजुरांना वेळोवेळी शासन नियमानुसार कंत्राटी मजुरांचे देय लाभ देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदारांची राहील.
6. दरपत्रकातील दर हे सर्व करांसहित असावेत.
7. दुग्धशाळेतील कामे दैनंदिन स्वरुपाची असून दरपत्रकामधील नमूद कामांकरिता लागणारे पुरुष मजुर दररोज पुरविणे आवश्यक राहील व शासकीय नियमानुसार दैनंदिन आठ तासाचे काम राहील (सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.००).
8. दुधाळ जनावरांचे दुध काढण्याची वेळ सकाळी ५.३० ते ७.०० व सायंकाळी ४ ते ५.३० राहील. कंत्राटधारकाने दुध काढण्याचा अनुभव असलेल्या व्यक्तींनाच दुध काढण्याकरिता पाठविणे बंधनकारक राहील. सदर वेळेत न चुकता दररोज पुरुष मजूर पुरविणे आवश्यक राहील.
9. वरिष्ठ अधिका-यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल. वेळेवर सांगितलेली सर्व कामे करावी लागतील.
10. सदर कामे जनावरांशी संबंधित असून दिलेल्या कामामध्ये बदल होऊ शकतो वेळेवर सांगितलेली कामे करावी लागतील.
11. सदर कंत्राटी मजूर पुरविणारे कंत्राटदार/संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. दुग्धशाळेमध्ये काम केल्याचा अनुभव असलेल्या कंत्राटधारकास प्राधान्य देण्यात येईल.
12. कंत्राटी कामावर लागतांना कंत्राटी काम करणा-या मजुरांचे दोन फोटो, आधार कार्ड, व्यक्तिश: संपूर्ण माहिती, पत्ता व दोन ओळखीच्या व्यक्तींचे नावे ई. माहिती विभागास सादर करावी लागेल.
13. कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तींची व्यवस्था कंत्राटदारास/ठेकेदारास करावी लागेल.
14. दरपत्रकामध्ये नमूद कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी मजुरांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार/ठेकेदार यांची राहील. कोणत्याही हानीची सदर कार्यालय भरपाई करून देणार नाही.
15. कंत्राटी काम करणा-या मजुरांचा जीवन विमा कंत्राटदाराने काढणे बंधनकारक राहील.
16. कंत्राटी कामाकरिता नेमलेल्या मजुरांना मदयपान किंवा धुम्रपान ई. व्यसन नसावे.
17. सदर कामे हि पूर्णत: ठेका पद्धती/कंत्राटी असल्या कारणाने मजुरांच्या वरिष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.
18. कार्यालयात केलेल्या कामाचे कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.
19. नमूद कामाचा ठेका मधेच/अर्धवट सोडून गेल्यास त्या महिन्याच्या कामाची मजुरी/रक्कम मिळणार नाही.
20. सदर कंत्राटदार संस्था असमाधानकारक काम करत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकर्त्याकडे असतील.
21. प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाच्या मजुरीचे देयक महिना संपल्यावर कार्यालयात सादर करावे लागेल.
22. केलेल्या कंत्राटी कामची शहानिशा करुन व कार्यालयीन प्रकियेनंतरच देयके काढण्यात येतील.
23. दरपत्रकामधील कंत्राटी कामाचे स्वरूप, लागणारे कंत्राटी मजूर ई. अधिक माहितीकरीता विभाग प्रमुख, पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

विभाग प्रमुख
पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

# <u>दरपत्रक</u>

**(FORM OF QUOTATION)**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील "**दुग्धशाळेतील जनावरांचे दुध काढणे, देखरेख व स्वच्छता इ. कामे**" ठेका/कंत्राटी पद्धतीने करणेकरिता दरपत्रक

| अ.क्र. | करावयाचे काम | तपशील | दर प्रति दिवस (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | गाय, म्हैस, बैल इत्यादी जनावरांची देखरेख (५० जनावरांपर्यंत प्रति दिवस) | विद्यापीठ प्रक्षेत्रावर दररोज दुग्धशाळेतील तसेच मलकापूर विभाग, म. सं.के. येथील जनावरे चारणे (सकाळी ८.०० ते ३.००), जनावरे चारून आणल्यानंतर गोठयामध्ये बांधणे व उपलब्ध असलेल्या हिरव्या चा-याची कुट्टी तयार करून टाकणे किंवा वाळलेला चारा मुक्त संचार गोठा तसेच बंदिस्त गोठयामधील गव्हाणीमध्ये टाकणे ई. कामे तसेच जनावरांसंबंधी वेळेवर सांगितलेली कामे | |
| २. | शेण काढणे व शेणखड्यात/गोबरगस खड्यात टाकणे व गोठ्याची स्वच्छता करणे (दोन वेळा) म्हैस (२० जनावरे) गाय (३० जनावरे) | दुग्धशाळेतील गोठ्यांची नियमित साफसफाई करणे- शेण जमा करणे, बैलगाडीमध्ये भरणे व गोबर गस किंवा शेणखत खड्डयाजवळ खाली करणे, दुग्धशाळेतील परिसरातील शेण उचलणे व साफसफाई करणे, दुधाळ जनावरांना हिरव्या चा-याची कुट्टी तयार करून टाकणे किंवा वाळलेला चारा गव्हाणीमध्ये टाकणे तसेच सांगितलेल्या वेळेत खाद्याच्या गव्हाणी, पाण्याचे टाके साफसफाई करणे, गोठे पाण्याने स्वच्छ धुवून काढणे, विद्यापीठ प्रक्षेत्रावरील चारा आणणे व दुग्धशाळेतील वेळोवेळी सांगितलेली जनावारासंबंधी इतर कामे करणे. | |
| ३. | राखण करणे व दुग्धशाळेतील जनावरांची देखभाल (५० जनावरे) | दुग्धशाळेमध्ये चौकीदारी करणे<br>रात्री जनावरांची काळजी घेणे व देखभाल करणे | |
| ४. | शेळी देखरेख २५ ते ३० शेळ्या/दिवस | शेळ्यांना प्रक्षेत्रावर चारावयास नेणे, चारा पाणी करणे, निवारा साफसफाई, परिसर साफसफाई,करडांना दूध पाजणे व काळजी घेणे इत्यादी कामे | |
| ५. | वासरे देखरेख ३० ते ४० जनावरे/दिवस | प्रक्षेत्रावर चारणे, चारा पाणी करणे, गोठे साफसफाई, परिसर साफसफाई, दूध पाजणे व काळजी घेणे इत्यादी कामे | |
| ६. | गाई/म्हशींचे दुध काढणे (१० जनावरे) | दुग्धशाळेतील गाई/म्हशींचे दररोज सकाळ व सायंकाळ दुध काढणे (सकाळी ५.३० ते ७.०० व सायंकाळी ४ ते ५.३०), जनावरांचे खाद्य भांडारगृहातून आणणे, दुध काढल्यानंतर चारा/कुट्टी टाकणे ई. कामे | |

निविदेमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक :

सही व शिक्का